# जिल्हा परिषद

- त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील वरिष्ठ स्तर म्हणजे जिल्हा परिषद होय. जिल्हा पातळीवर कार्य करणारी महत्वाची संस्था आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ६ नुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा परिषद असावी अशी तरतूद करण्यात आली आहे.
- १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात जिल्हा परिषद कार्यरत आहे.
- सध्या महाराष्ट्रामध्ये ३६ जिल्हे आहे, परंत्तू ३४ जिल्हा परिषदा अस्तित्वात आहे.
- महाराष्ट्रातील मुंबई व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद अस्तित्वात नाही.
- महाराष्ट्रातील वसंतराव नाईक समितीने जिल्हा परिषदेला सर्वाधिक महत्व दिले.
- क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा अहमदनगर तर दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा पुणे होय.
- क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात लहान जिल्हा मुंबई शहर आहे.
- जिल्हा परिषद निर्माण करण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो.
- महाराष्ट्रातील ३६ व जिल्हा पालघर ( १ ऑगस्ट २०१४ पासून )

| विविध राज्यातील जिल्हा परिषदांची नावे | |
|---|---|
| महाराष्ट्र | जिल्हा परिषद |
| आसाम | महाकमा परिषद |
| कर्नाटक | जिल्हा विकास परिषद |
| गुजरात | जिल्हा परिषद |
| पश्चिम बंगाल | जिल्हा परिषद |
| तामिळनाडू | जिल्हा विकास परिषद |
| बिहार | जिल्हा परिषद |

## ➢ जिल्हा परिषदेची रचना :

- महाराष्ट्रात जिल्हा परिषदेची सदस्य संख्या ५० ते ७५ इतकी आहे.
- जिल्हा परिषदेच्या मतदार संघाला 'गट' म्हणतात.
- जिल्हा परिषदेचा एक प्रतिनिधी साधारण पणे ४०, ००० लोकसंख्ये मागे निवडला जातो.
- जिल्हा परिषदेच सदस्यांची निवड प्रत्यक्ष प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीच्या आधारे जनतेमार्फत केली जाते.
- जिल्हा परिषदे क्षेत्रातील पंचायत समितीचे सभापती जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्य असतात. मात्र त्यांना मतदानाचा अधिकार नसतो.
- जिल्हा परिषदेच्या निवडणूका राज्य निवडणूक आयोगामार्फत घेतल्या जातात.
- जिल्हा परिषद सदस्य संख्या ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारला असतो.
- उपमुख्यकार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा पदसिद्ध सचिव असतो.

## ➢ सभासदांची पात्रता :

१) तो व्यक्ती भारताचा नागरिक असावा.
२) वयाची २१ वर्ष पूर्ण केली असावी.
३) जिल्ह्यच्या मतदार यादीमध्ये नाव असणे आवश्यक
४) १२ सप्टेंबर २००१ नंतर ३ रे अपत्य असून नये.
५) ती व्यक्ती कोणत्याही शासकीय सेवेत नसावी.
६) राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निश्चित केलेल्या अति पूर्ण केलेल्या असाव्यात.
७) त्याच्या राहत्या घरी स्वच्छतागृह असून त्याचा नियमित वापर असावा

## ➢ सदस्यांची अपात्रता:

- दिनांक १२ सप्टेंबर २००१ नंतरचे तिसरे अपत्य असलेली व्यक्ती
- राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अटी पूर्ण न केल्यास
- स्वतःच्या राहत्या घरी शोउचलय नसल्यास
- तो मुका किंवा अविमुक्त दिवाळखोर असल्यास

- वयाची २१ पूर्ण नसल्यास
- अस्पृश्यता कायदा १९५८ व महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ किंवा निवडणूक भ्रष्टाचार कायद्याने दोषी ठरवलेली व्यक्ती
- कोणत्याही ग्रामपंचायतीचा सदस्य असल्यास
- संसद किंवा विधिमंडळ सदस्य असल्यास
- तो दिवाळखोर किंवा जिल्हा परिषदेच्या करांचा थकबाकी दार असल्यास
- भारतातील न्यायालयाने तिला कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवून कमीत कमी एक वर्ष कैदेची शिक्षा दिली असेल आणि ती कैदेतून सुटल्यापासून राज्य निर्वाचन आयुक्ताने ठरवून दिलेला विशिष्ट कालावधी लोटला नसेल तर
- तो केंद्र- राज्य अथवा स्थानिक शासनाच्या शासकीय नोकर असल्यास
- राखीव प्रवर्गात राखून ठेवलेल्या जागेवर निवडून आलेल्या सदस्यांचे जातीविषयक प्रमाणपत्र जात पडताडणी समितीने किंवा जात प्रमाणपत्र छाननी समितीने अपात्र ठरविलेल्या व्यक्ती

## ➢ अनामत रक्कम :

- सर्वसाधारण उम्मेदवारासाठी - १००० रु.
- अनु. जाती / जमाती च्या उम्मेदवारासाठी - ७५० रु.

## ➢ खर्च मर्यादा :

- जुनी खर्च मर्यादा - ६० हजार रु.
- सुधारित खर्च मर्यादा - ३ लाख रु.

## ➢ आरक्षण :

१) महिलांना : ५० टक्के राखीव जागा ( २०११ पासून )

२) इतर मागासवर्गीय : २७ टक्के राखीव जागा.

३) अनु. जाती / जमाती : लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा.

४) आरक्षणाच्या जागा निर्धारित करण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो.

## ➢ निवडणूका :

- जिल्हा परिषदेचा १ सदस्य ४० हजार लोकसंख्येमागे निवडला जातो.
- सदस्यांची निवड प्रत्यक्ष, प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीनुसार करण्यात येते.

## ➢ बैठक :

- जिल्हा परिषदेच्या एका वर्षाला ४ बैठका घेणे बंधनकारक आहे.
- जिल्हा परिषदेच्या दोन बैठकांमधील अंतर ३ महिन्यांचे असते.
- जिल्हा परिषदेची पहिली बैठक जिल्हाधिकारी बोलवतात या बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड केली जाते. ( अध्यक्ष : जिल्हाधिकारी )
- जिल्हा परिषदेचा पहिली बैठकीची नोटीस किमान १५ दिवस अगोदर काढावी लागते.

## ➢ निवडणुकीवबत वाद :

- दोन उमेदवारास सामान मते पडल्यास चिठ्ठ्या टाकून उमेदवार निवडला जातो.
- निवडणुकीमध्ये गैरव्यवहार झाल्यास निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसाच्या आत जिल्हाधिकारी यांच्या कडे तक्रार करता येते.
- जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय मान्य नसल्यास त्या निर्णयाविरुद्ध १५ दिवसाच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येते.

## ➢ सदस्यांची बडतर्फी :

- सदस्य सतत ६ महिने गैरहजर असल्यास त्याचे सदरस्यत्व रद्द होते.
- काही विशिष्ट कारणात्सव राज्य साशन जिल्हा परिषद सदस्याला बडतर्फ़ करू शकतात.
- १/३ सदस्यांनी ठराव मांडून २/३ बहुमतांनी पारित केल्यास, महिला सदस्य असल्यास ३/४ बहुमत असल्यास बडतर्फ केल्या जाते.
- निवड झाल्यापासून ६ महिन्यापर्यंत अविश्वास ठराव मांडता येत नाही. एकदा फेटाळला गेलेला ठराव पुन्हा १ वर्षापर्यंत मांडता येत नाही.

## ➢ कार्यकाल :

- जिल्हा परिषद व सदस्यांच्या कार्यकाळ ५ वर्षाचा असतो.
- विशिष्ट परिस्थितीत राज्य शासन जिल्हा परिषदेचा कार्यकाळ कमी- अधिक करू शकतात. ( वेडेवर निवडणुका न झाल्यास राज्य शासन ६ महिन्याचा कार्यकाळ वाढवू शकते. )
- जिल्हा परिषदेचे विसर्जन झाल्यास ६ महिण्याच्या आत निवडणूक घेणे बंधनकारक राहील.

## ➢ राजीनामा :

| कोण | | कोणाकडे |
|---|---|---|
| जि. प. सदस्य | - | जी. प अध्यक्षांकडे |
| जि. प. उपाध्यक्ष | - | जि. प. अध्यक्षांकडे |
| जि. प. अध्यक्ष | - | विभागीय आयुक्ताकडे |

## ➢ जिल्हा परिषदेच्या उत्पनाची साधने

- राज्य सरकार प्रत्येक जिल्हा परिषदेस विकास कार्यासाठी ७५ टक्के अनुदान देते.
- जिल्हा परिषद क्षेत्रातील महसूल उत्पन्नाच्या ७० टक्के अनुदान जिल्हा परिषदेला मिळते.
- जिल्ह्यातील विविध कराद्वारे उत्पन्न मिळते. (पाणीपट्टी, मनोरंजन, यात्राकर, घरपट्टी, बाजार इ.)
- राज्य शासन एकूण जमीन महसुलाच्या ७० टक्के रक्कम जिल्हा परिषदेला देते.

## ➢ हिशोब तपासणी :

- भारताचे आर्थिक वर्षे १ एप्रिल ते ३१ मार्च आहे.
- जिल्हा परिषदेची हिशोब तपासणी लोकलेखा समिती व संबंधित राज्याचे महालेखापाल यांच्याकडून केली जाते. कार्यकालीन तपासणी राज्यशनाद्वारे केली जाते.

## ➢ अंदाजपत्रक :

- जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक मुख्य कार्यकारी अधिकारी ( CEO ) तयार करतात
- जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेची स्थायी समिती मंजूर करते.

## जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्य

- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १०० मध्ये जिल्हा परिषदेच्या अधिकार व कार्याचे वर्णन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेकडे सुरवातीला १२९ विषय सोपविण्यात आले होते. परंतु सध्या परिषदेकडे १२८ विषय आहेत राज्य शासनाने १९६६ साली आपल्या १२३ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्या.

1. कृषी, पशुसंवर्धन व दुग्धविकास, जलसिचनाविषयीची योजना राबविणे.
2. शेती संबंधित नवनवीन तंत्रज्ञान व बी-बियाणे शेतकऱ्यापर्यंत पोहचविणे.
3. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींना शैक्षणिक सुविधा पुरविणे.
4. जिल्ह्यातील विविध विकास योजनांना मंजुरी देणे.
5. जिल्ह्याच्या नियोजनबद्ध विकासासाठी स्थानिक साधन सामुग्रीचा उपयोगिता वाढविणे
6. जिल्हा परिषदेचा विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
7. सार्वजानिक आरोग्य राखण्याचा दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करणे.
8. जिल्हा स्तरावर विविध साथीच्या रोगांवर प्रतिबंधासाठी लसीकरण कार्यक्रम राबिवणे.
9. ग्रामीण भागातील रस्ते व दळणवळण विषयक सुविधा उपलब्ध करून देणे.
10. आदिवासी लोकांना विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी आश्रमशाळा व मोफत वाचनालय, व वसतिगृहाची व्यवस्था करणे.
11. ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे.
12. राज्य सरकारने वेळोवेळी सोपवलेली कार्य पार पाडणे.
13. पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.

- जिल्हा परिषद सदस्य, पदाधिकारी याना पिवळया रंगाचे ओडखपत्र दिले जाते. कार्यकाळ संपल्यानंतर ओडखपत्र ( मुख्यकार्यकारी अधिकारी ( CEO ) यांच्याकडे जमा करणे बंधनकारक आहे.

## ➢ जिल्हा परिषदेची आमसभा :

- जिल्ह्यातील विविध विकास योजनेचा आढावा घेऊन त्यावर योग्य ती चर्चा करण्यासाठी पप्रत्येक वर्षाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आमसभा बोलावतात. तसेच या सभेमध्ये जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकावरही प्राथमिक स्वरूपाची चर्चा करण्यात येते.
- बैठका – एका वर्षाला दोन घेतल्या जातात.
- अध्यक्ष – जिल्ह्याचे पालक मंत्री
- सचिव – जिल्हाधिकारी
- सदस्य – खासदार, आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व सभापती, उपसभापती.
- जिल्हा परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी १/५ सदस्यांनी मागणी केल्यास जिल्हा परिषदेची विशेष सभा बोलावली जाते.
- जिल्हा परिषदेची मतदार संघाला अंतिम मंजुरी विभागीय आयुक्त देतात व जिल्ह्धिकारी अंतिम माहिती प्रसिद्ध करतात.

## ➢ जिल्हा परिषदेचा समित्या :

- जिल्हा परिषदेचे कामकाज सुरळीपणे चालविण्यासाठी समित्यांची स्थापना केली जाते.
- जिल्हा परिषदेच्या एकूण दहा समित्या आहे.
- सामान्यपणे जिल्हा परिषदेची पहिली सभा झाल्यानंतर एका महिन्याच्या आत समित्यांची रचना केली जाते. जिल्हा परिषदेची सर्वात महत्वाची समिती स्थायी समिती आहे.

### १) स्थायी समिती :

- एकूण सदस्य – १५
- सभापती – जिल्हा परिषद अध्यक्ष
- सचिव – उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( Dy. CEO )



## ➢ कार्ये :

१) जिल्हा परिषदेच्या अन्दाजपत्रकाला अंतिम मंजुरी देणे.

२) जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची व मासिक हिशोबाची तपासणी करणे.

३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास एक महिन्यापर्यंत रजा देणे.

४) जिल्हा परिषदेच्या सर्व कामांच्या प्रगतीने नियमन व कालावधी यांचे पुनर्विलोकन करणे.

५) जिल्हा निधीच्या गुंतवणुकीची व्यवस्था आणि विनिमय करणे.

६) जिल्हा परिषदेच्या जमा खर्चाचे मासिक हिशोब तपासणे.

## २) कृषी समिती :



- सदस्य संख्या – ११
- सभापती – सदस्यांपैकी एक
- सचिव – जिल्हा कृषी अधिकारी

## ३) समाज कल्याण समिती :



- सदस्य संख्या – ११
- सभापती – मागासवर्गीय व्यक्तीकडे दिले जाते.
- महिला आरक्षण – ३० टक्के बंधनकारक
- सचिव – समाज कल्याण अधिकारी

## ४) पशुसंवर्धन व दुधव्यवसाय समिती :

- सदस्य संख्या – १०
- सभापती – सदस्यांपैकी एकाकडे
- सचिव – जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

## ५) अर्थसमिती :




- सदस्य संख्या – ८
- सभापती – जिल्हा परिषद उपाध्यक्ष
- सचिव – मुख्यलेखापाल

## ६) बांधकाम समिती :



- सदस्य संख्या – ८
- सभापती – जिल्हा परिषद उपाध्यक्ष
- सचिव – कार्यकारी अभियंता

## ७) शिक्षण समिती :



- सदस्य संख्या – ८
- सभापती – जिल्हा परिषद उपाध्यक्ष
- सचिव – जिल्हा शिक्षण अधिकारी

## ८) आरोग्य समिती :



- सदस्य संख्या – ८
- सभापती – जिल्हा परिषद उपाध्यक्ष
- सचिव – जिल्हा आरोग्य अधिकारी

## ९) महिला व बालकल्याण समिती :

- सदस्य संख्या – ८( ७० टक्के महिला बंधनकारक )
- सभापती – महिला बंधनकारक
- सचिव – उपमुख्यकार्यकारी अधिकारी(महिला व बालविकास)
- सुरवात – १९९२ पासून कार्यरत

## १०) जलसंधारण व पेयजल पुरवठा समिती :



- सदस्य संख्या – ८
- सभापती – जिल्हा परिषद अध्यक्ष
- सचिव – कार्यकारी अभियंता
- सुरवात – १९९३ पासून कार्यरत

- सर्व समित्यांच्या सभापतींच्या कार्यकाल अडीच वर्षाचा असतो.
- सर्व सभापतींना दरमहा १२, ००० रु. मानधन दिले जाते.
- जिल्हा परिषद अध्यक्ष हे स्थायी समिती व जलसंधारण व पेयजल पुरवठा समितीचे पदसिद्ध सभापती असतात.
- कृषी समिती व पशुसंवर्धन व दुग्ध विकास समिती या दोन्ही समितीचे सभापतिपद एकाच व्यक्तीकडे असते.
- एखाद्या सदस्य सतत ६ महिने गैरहजर असल्यास त्याचे सभासदत्व रद्द होते.

- आरोग्य समिती, वित्त समिती, शिक्षण समिती, बांधकाम समिती, या चारही समितीचे सभापतिपद जिल्हा परिषद उपाध्यक्षाकडे असते.
- २००० ला नागपूर अधिवेशनात जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व समित्यांच्या सभापतींचा कार्यकाळ अडीच वर्षाचा करण्यात आला.

## ❖जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष :

- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ४२ नुसार प्रत्येक जिल्हा परिषदेसाठी एक अध्यक्ष निवडला जातो. व कलम ६४ मध्ये त्यांचा कार्यांचा उल्लेख केला आहे.
- जिल्हा परिषदेचा सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर जिल्हाधिकारी सर्व सदस्यांची पहिली बैठक बोलावतात व त्या बैठकीमध्ये सदस्यांमार्फत एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड केली जाते. ज्या जिल्ह्याची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा अधिक अनुसूचित जाती व जमातीची असते. त्या जिल्ह्याचे जिल्हा परिषद कायम अनुसूचित जाती व जमाती याना जाते. दोन उमेदवारांना सामान मते पडल्यास चिठ्या टाकून अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडले जातात.
- अध्यक्षपदाच्या आरक्षणाच्या जागा निर्धारित करण्याचा अधिकार राज्य सरकारला असतो.
- महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष पद फक्त दोनच वेळा उपभोक्ता येते.
- महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषद अध्यक्षाला राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेला आहे.

### ➢निवडणुकीबाबत वाद :

- जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडीबाबत काही वाद निर्माण झाल्यास निवडीनंतर ३० दिवसाच्या आत विभागीय आयक्तकडे तक्रार करता येते. विभागीय आयुक्तांच्या निर्नियाविरुद्ध राज्य शासनाकडे ३० दिवसाच्या आत अपील करता येते.

### ➢पात्रता :

१) वयाची २१ वर्ष पूर्ण केलेली असावी.

२) तो व्यक्ती जिल्हा परिषद सदस्य असावा.

३) १२ सप्टेंबर २००१ नंतर ३ रे अपत्य असू नये.

४) त्यांच्याकडे स्वत:चे स्वच्छतागृह असणे आवश्यक.

## ➢ आरक्षण :

- महिलांना ५० टक्के राखीव जागा ( २०११ पासून )
- इतर मागासवर्गीयांना २७ टक्के राखीव जागा.
- अनुसूचित जाती जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा.
- उपाध्यक्ष पदाला आरक्षण लागू नाही.
- आरक्षणाच्या जागा निर्धारित करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. ( आरक्षण हे फिरत्या पद्धतीने दिले जाते )

## ➢ कार्यकाल :

- जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कार्यकाळ अडीच वर्षाचा असतो. हा कार्यकाल २००० पासून करण्यात आला आहे.

## ➢ राजीनामा :

| कोण | | कोणाकडे |
|---|---|---|
| सदस्य | - | जी. प. अध्यक्षांकडे |
| उपाध्यक्ष | - | जी. प. अध्यक्षांकडे |
| जी. प. अध्यक्ष | - | विभागीय आयुक्ताकडे |
| स्थायी समिती सभापती | - | विभागीय आयुक्ताकडे |
| सर्व समित्यांचे सभापती | - | जी. प. अध्यक्षांकडे |

## ➢ रजा :

- अध्यक्ष वर्षातून जास्तीत जास्त ३० दिवस विनापरवानगी गैरहजर राहू शकतो.
- ९० दिवसापर्यंत जिल्हा परिषद अध्यक्षास स्थयी समिती राजा देऊ शकतो.

- ९० दिवसापेक्षा अधिक राजा हवी असल्यास राज्य शासन देते.
- एका वर्षात अध्यक्षांना जास्तीत जास्त १८० दिवस रजा मिळते. त्यापेक्षा अधिक राजा दिली जात नाही.

## ➢मानधन ( दरमहा ) :

| संबंधित व्यक्ती | सुधारित ( २०१२ ) | जुने |
|---|---|---|
| अद्यक्ष | २०,०००/-रु. | ५००० रु. |
| उपाध्यक्ष | १६,०००/-रु. | ४००० रु. |
| समित्यांचे सभापती | १२,०००/- रु. | ४००० रु. |

## ➢अविश्वास ठराव :

- गैरवर्तवणूक, अकार्यक्षमता, भ्रष्टाचार इत्यादी कारणावरून राज्य सरकार बडतर्फी करू शकतात.
- जि. प. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या विरोधामध्ये १/३ सदस्यांनी अविश्वास ठरावाची मागणी केल्यास.
- अविश्वास ठराव २/३ बहुमताने पारित झाल्यास व महिला सदस्य असल्यास ३/४ बहुमत लागले. ( सभेचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. )
- निवड झाल्यापासून ६ महिन्यापर्यंत अविश्स्वाचा ठराव मांडता येत नाही. एकदा फेटाळला गेलेला अविश्वासाचा ठराव पुन्हा एका एका वर्ष पर्यंत मांडता येत नाही.

## ➢ जिल्हा परिषद अद्यक्ष व उपाध्यक्ष अधिकार व कार्य :

- जिल्हा परिषदेची सभा बोलावणे व त्या सभेचे अध्यक्षस्थान भूषविणे.
- जिल्हा परिषद सदस्यना मार्गदर्शन करणे व सभा नियंत्रित करणे.
- जिल्हा परिषदेचा विविध निर्णयाची अंमलबजावणी करणे.
- मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे.

- जिल्हा परिषदेचे अभिलेख व रेकार्ड पाहणे.
- जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचा सभापती या नात्याने विविध कार्य पार पाडणे.
- जिल्हा परिषदेच्या नोकर वर्गावर देखरेख ठेवणे व त्यांच्या कडून आवश्यक ती कागदपत्रे मागवणे.
- जलसंधारण कव पेयजल पुरवठा समितीचा सभापती या नात्याने विविध कार्य पार पाडणे.
- मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा गोपनीय अहवाल लिहिणे व तो विभागीय आयुक्तांना सादर करणे.
- अर्थ संकल्पनात तरतूद नसलेल्या विकास योजना राबविण्यासाठी जिल्हा निधीतून खर्चाचे निर्देश देणे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे.

## ❖मुख्य कार्यकारी अधिकारी ( CEO )

- महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९४ मध्ये मुख्य कातकरी अधिकाऱ्यांची तरतूद करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची तरतूद करण्यात आली आहे. मुख्य आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी हा भारतीय प्रशासन सेवेतील ( IAS ) दर्जाचा वरिष्ठ अधिकारी असतो. मुख्य कातकरी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख असतो.
- निवड - केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे ( UPSC )
- नेमणूक - राज्य शासन
- दर्जा - ( IAS ) चा असतो
- वेतन - राज्याची निधीतून दिले जाते.
- राजकीय नियंत्रण - जिल्हा परिषद अध्यक्ष
- प्रशाकीय नियंत्रण - विभागीय आयुक्त
- रजा - स्थायी समिती सभापती ( २ महिन्ययापर्यंत ) दोन महिन्याचेपेक्षा अधिक रजा राज्य शासन देते.
- राजीनामा - राज्य शासन
- बडतर्फी - केंद्र शासन

## ➢ अधिकार आणि कार्य :

- महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१ मधील कलम ९५ मध्ये कार्याचा उल्लेख करण्यात आला आहे.
- जिल्हा परिषद कायद्यानुसार वेळोवेळी सोपविलेले कार्य पार पाडणे.
- जिल्हा परिषदेचे इतर अधिकारी व कर्मचारी यांची कार्य निश्चित करणे.
- जिल्हा परिषदेचा कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- जिल्हा परिषदेचा वर्ग-१ व वर्ग -२ च्या अधिकाऱ्यांची दोन महिन्याची रजा मंजूर करणे. व त्याचा अहवाल लिहणे.
- जिल्हा परिषदेचा वर्ग -३ व वर्ग -४ च्या कर्मचाऱ्यांची भरती करणे ( ग्रामसेवकाची नेमणूक )
- जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक तयार करणे व जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीला सादर करणे.
- जिल्हा विकास निधीतून पैसे काढणे व विकास कार्यावर खर्च करणे.
- जिल्हा परिषदेच्या एखाद्या कर्मचारी दीर्घ रजेवर गेल्यास त्या जागी हंगामी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे.
- जिल्हा परिषदेची सर्व कागदपत्रे, अभिलेख सांभाळणे व सर्व सभांचे इतिवृत्तांत लिहिणे.
- जिल्हा परिषदेमध्ये एकापेक्षा अधिक उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतात.
- जिल्हा परिषदेची विकास कामे व विविध योजनांची गती देणे.
- जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्याकडून आवश्यक ती माहिती मागवू शकतो.

## ➢ विषय सूची :

- ग्रामपंचायत - ७९ विषय
- पंचायत समिती - ७४ विषय
- जिल्हा परिषद - १२९ विषय

- सध्या जिल्हापरिषदेकडे १२८ विषय आहेत.
- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील महत्वाच्या तरतुदी :

| कलम | विषय |
|---|---|
| ४ | जिल्हयांची रचना |
| ६ | जिल्हापरीषदेची स्थापना, रचना, सदस्य संख्या, अधिकारी यांच्या बाबत तरतूद |
| ९ | जिल्हा परिषदांची रचना |
| ९-अ | राज्य निवडणूक आयुक्त |
| १० | परिषद सदस्यांची निवडणूक व त्यांचा पदावधी |
| ११ | परिषद सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ |
| १२-अ | राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे. |
| १४ | निवडणुकिची तारीख |
| १५-ब | राज्य निवडणूक आयोगाकसून निर्हर ठरविणे |
| १६ | निर्हरता |
| २७-अ | निवडणूक विषयक बाबींमध्ये न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध |
| २८-ब | निवडणुकीच्या आदल्या दिवशी किंवा निवडणुकीच्या दिवशी सार्वजानिक सभा भरविण्यास मनाई |
| २९ | मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई |
| ३८ | परिषद सदस्यांचे राजीनामे |
| ४२ | अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक |
| ४३ | अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचा पदावधी |
| ४५ | अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीची कार्यपद्धती |

| कलम | विषय |
|---|---|
| ४६ | अध्यक्षाला द्यावयाचे मानधन आणि इतर सुविधा |
| ४८ | अध्यक्ष आणि यांच्या राजीनामा |
| ४९ | अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या विरूद्ध अविश्वासाचा ठराव |
| ५२ | अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची रिकामी झालेली अधिकारपदे भरणे |
| ५४ | अध्यक्षाचे अधिकार व त्यांची कार्य |
| ५५ | उपाध्यक्षाची कार्य |
| ५६ | पंचायत समित्यांची रचना |
| ५७ | पंचायत समित्यांची रचना |
| ५८ | निर्वाचक गण, निर्हरता, निवडणुका व निवडणुकांविषयक |
| ५९ | पंचायत समितीच्या सदस्यांची पदावधी |
| ६० | पंचायत समितीच्या सदस्य मानून राजीनामा देणे |
| ६२ | पंचायत समितीच्या सदस्यांची निर्हरता |
| ६२-अ | राज्य निवडणूक आयोगाकडून निर्हर ठरविणे |
| ६४ | पंचायत समीतीच्या सभापती व उपसभापती यांची निवडणूक |
| ६५ | पंचायत समितीचा सभापती व उपसभापती यांचा पदावधी |
| ६८ | उपसभापती निवडणूक |
| ६९ | पंचायत समितीचा सभापती व उपसभापती यांना मानधन व भत्ता देणे. |
| ७१ | सभापती व उपसभापती यांच्या राजीनामा |
| ७२ | पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती यांच्या विरुद्ध अविश्वास ठराव. |

| कलम | विषय |
|---|---|
| ७३ | पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती यास गैरवर्तणूक वगैरे केल्याबद्दल अधिकार पदावरून दूर करणे |
| ७६ | पंचायत समितीच्या सभापतींच्या अधिकार व त्यांची कार्य |
| ७७ | पंचायत समितीच्या उपसभापतीचे अधिकार व त्याची कार्य |
| ७७-अ | सरपंचाची समिती |
| ७८ | स्थायी समिती, विषय समित्या व इतर समित्या योनीची नेमणूक |
| ७९-अ | जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीची रचना |
| ८२ | स्थायी समितीच्या व विषय समितीच्या सदस्यांच्या पदावधी |
| ८४ | विषय समित्यांच्या सभापती द्यायवाचे मानधन |
| ८४-अ | आदेशाद्वारे मानधनाच्या रक्कमेत फेरफार करण्याचा राज्य शासनाच्या अधिकार |
| ८७ | विषय समितीच्या सभापतीविरुद्ध अविश्वाचा ठराव |
| ९१ | स्थायी समिती व विषय समिती यांच्या सभापतीचे अधिकार व कार्य |
| ९४ | मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांची नेमणूक |
| ९५ | मुख्य कार्यकारी अधिकार्यांचे अधिकार व कार्य |
| ९६ | अकार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्याचे अधिकार आणि त्याचे कामे |
| ९८ | गट विकास अधिकाऱ्यांचे अधिकार व कार्य |
| ९९ | जिल्हा परिषदेचा विभाग प्रमुखाचे अधिकार व कार्य |
| १००. | जिल्हा परिषदेचे प्रशासकीय अधिकार व कर्त्यवे |
| १०६ | जिल्हा परिषदेचे अधिकार व तिची कार्य १०८ या कलमानुसार जिल्हा परिषदेचे आदेश पाळणे पंचायत समितीवर बंधनकारक आहे. |

| कलम | विषय |
|---|---|
| १०८-अ | जिल्हा परिषदेने दिलेल्या आदेशानुसार पंचायत समितीने वागणे. |
| १०९ | वित्त समितीने विशेष अधिकार व तिचे कार्य |
| १११ | जिल्हा परिषदांच्या सभा |
| ११७ | पंचायत समितीच्या सभा |
| १२८ | मालमत्ता संपादन करण्याचा व ती भाडेपट्याने देण्याचा, विकण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा जिल्हा परिषदेचा अधिकार |
| १२९ | जिल्हापरिषदेची मालमत्ता |
| १३० | जिल्हा निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक |
| १३१ | विशेष निधी निर्माण करणे. |
| १३४ | जिल्हा निधीतून रक्कमा कश्या काढाव्यात |
| १३६ | लेख्यांचे विवरण तयार करणे व लेख्यांच्या विवर्णांचा गोषवारा प्रसिद्ध करणे. |
| १३७ | प्राप्तीचे व खर्च्यांचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे. |
| १४२ | प्रशासन अहवाल |
| १४२-अ | परिषदांचे व समित्यांचे हिशेब तपासण्याच्या महालेखाकारचा अधिकार |
| १४६ | पाणीपट्टीवर उपकर बसवणे |

## ❖नागरी स्थानिक स्वराज्य संस्था :

- नागरी प्रशासनाची सुरवात प्राचीन कालखंडामध्ये झालेली दिसून येते. कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये नागरी अधीक्षकाच्या उल्लेख आढळतो.
- इ. स. पूर्व तिसऱ्या शतक भारतात आलेल्या मॅगेस्थेनिस या ग्रीक प्रवांशाचा ‘इंडिका’ या भारत विषयक प्रवास वर्णनांमध्ये भारतातील प्राचीन नगर प्रशासनाचे वर्णन आढळते.

- मोगल कालखंडामध्ये नागरी प्रशासनावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. व कोतवाल नावाच्या अधिकार्यादारे नागरी प्रशासन चालविले जात होते.
- भारतातील पहिली मनपा १६८७ ला मद्रास येथे स्थापन करण्यात आली. ( सम्राट जेम्स दुसरा याने स्थापन केली. )
- महाराष्ट्र प्रशासनाची सुरवात १७२६ साली मुंबई येथे मेयर कोर्टाची स्थापना करून करण्यात आली.
- १७९३ साली भारतात पहिल्या चार्टर ऍक्टनुसार कलकत्ता व मुंबई या शहरासाठी नगरपालिका स्थापना करण्यात आली.
- नागरी स्थानिक स्वशासनासंबंधी पहिला कायदा १८७० ला लॉर्ड मेयो यांनी केला.
- १८८२ ला लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वशासनासंबंधी पहिला कायदा केला.
- १८४२ ला बंगाल प्रांतासाठी पहिला मुन्सिपल कायदा करण्यात आला.
- संपूर्ण भारतासाठी १८५० ला मुन्सिपाल कायदा संमत करण्यात आला.
- १८८४ ला मुंबई लोकल बोर्डाची स्थापना करण्यात आली.
- महाराष्ट्रात १८८८ साली मुबई शहतासाठी पहिली महानगरपालिका निर्माण करण्यात आली.
- मुंबई जिल्हा नगरपालिका कायदा १९०१ ला अस्तित्वात आला.
- १९३३ ला बॉंबे व्हिलेज पंचायत एक्ट अस्तित्वात आला.
- महाराष्ट्र नगरपालिका, महानगरपालिका अधिनियम – १९६५ ला अस्तित्वात आला.
- ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. ( कलम २४३ ( P ) ते २४३ ( ZG) मध्ये तरतूद.
- भारतातील अरुणाचल प्रदेशात नागरिक स्थानिक संस्था अस्तित्वात नाही.

## ➤नागरी स्थानिक स्वराज्य संस्था :

1. नगरपंचायत
2. नगरपालिका
3. महानगरपालिका
4. छावणी मंडळ

★★★★★